## निशाणी क्र. ६५ वरील आदेश

प्रतिवादी क्र. १ यांनी सदरचा अर्ज त्याचेविरूध्द झालेला विनाकैफियत आदेश रद्द होवून त्यांची कैफियत स्वीकारणेसाठी दाखल केला आहे. त्याचे म्हणण्यानुसार, सदरकामी दरम्यानच्या काळात वादी व प्रतिवादीमध्ये तडजोडीबाबत बोलणी सुरु होती तसेच तलाठयांकडून दाव्यासंबंधीचे कागदपत्र मुदतीत न मिळाल्याने व दरम्याने कोविड – १९ चा आजार सुरु झाल्याने कैफियत मुदतीत देता आलेली नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ विरुध्द विनाकैफियत आदेश झालेला आहे. कैफियत दाखल करुन न घेतल्यास प्रतिवादीच्या न्याय हक्कावर विपरीत परिणाम होणार असून तच्या हक्कासही बाध येणार आहे. सबब प्रतिवादी क्र. १ याचे विरुध्द झालेला विना कैफियतीचा आदेश रद्द करणेत येवून त्याची कैफियत दाखल करणेस परवानगी मिळावी अशी विनंती प्रस्तुत प्रतिवादीने केली आहे.

२. वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत प्रतिवादीचा सदर अर्ज व त्यातील मजकूर खोटा व खोडसाळ आहे. नमूद केलेली कारणे संयुक्तीक नाहीत. सबब सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती प्रस्तूत वादीने केली आहे.

३. प्रतिवादी आणि वादीतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

४. सदर दावा वाटप व पृथक कब्जाकरीता दाखल करण्यात आला आहे. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिवादी यांना याच न्यायालयात त्याची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास वाद मुद्दयाचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरूध्द् होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरूध्द त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. परिणामी, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

## **आदेश**

१. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/–

स्थळ : देवगड ( बी.आर.पाटील )

दिनांक: ०४/१०/२०२१ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.